**साथरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत औषधे खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः खरेदी-२०१८/प्र.क्र.३२०/आरोग्य-८**

नविन मंत्रालय, गोकुळदास तेजपाल रूग्णालय कंपांउंड,
कॉम्प्लेक्स बिल्डिंग, १० मजला, मुंबई ४०० ००१.
दिनांक : ८ मार्च, २०१९.

**संदर्भ-**

१) सहसंचालक, आरोग्य सेवा ( हिवताप,हत्तीरोग व जलजन्य रोग), आरोग्य सेवा संचालनालय, पुणे यांचे पत्र क्रमांक ससंआसे/साथरोग/औषध खरेदी/सुधा.अनुदान/प्रशासकीय मान्यता/कक्ष-५८/२०६८-७४/१९, दिनांक २०/०२/२०१९.
२) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.२५.०१.२०१९.
३) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक खरेदी-२०१६/प्र.क्र.२४०/आरोग्य-८, दिनांक २६.०७.२०१७.

**प्रस्तावना -**

साथरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जलजन्य आजार, अतिसार, गॅस्ट्रो, विषमज्वर, जलजन्य काविळ, लेप्टोस्पायरोसीस तसेच स्वाईन फ्ल्यू आजाराच्या नियंत्रणासाठी औषधे खरेदी करण्यात येते. सहसंचालक, आरोग्य सेवा (हिवताप, हत्तीरोग व जलजन्य रोग), आरोग्य सेवा संचालनालय, पुणे या कार्यालयामार्फत राज्यातील साथरोग परिस्थितीचे संनियंत्रण केले जाते. साथरोग नियंत्रण कार्यक्रमांकरिता औषधे खरेदी करण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्याबाबत संदर्भीय पत्रान्वये प्रस्ताव प्राप्त झाला आहे. त्यानुसार सदरहु औषधे खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन निर्णय-**

आरोग्य सेवा संचालनालयाने संदर्भीय पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने साथरोग नियंत्रण कार्यक्रमांकरिता विवरणपत्रात दर्शविण्यात आलेल्या औषधांची खरेदी करण्यासाठी अंदाजित रु.१,११,७५,९९४/- (रु. एक कोटी अकरा लाख पंच्याहत्तर हजार नऊशे चौ-याण्णव फक्त) खालील अटींच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे:-

| अ.क्र | औषधाचे नाव | प्रस्तावित खरेदीची संख्या | अंदाजे रक्कम (रुपये) | लेखाशिर्ष |
|---|---|---|---|---|
| १ | Amoxycillin+Clavulanic acid Tab 500mg + 125 mg | 131410 | 4,62,339/- | 22104286 |
| २ | Azithromycin Tab 500 mg (73.3) | 649400 | 5,87,189/- | |
| ३ | Furazolidone Tab 100 mg [121.1] | 14776250 | 7,29,665/- | |
| ४ | Oseltamivir Phosphate Syp.75 ml (546.03) | 17018 | 18,25,600/- | |
| ५ | Paracetamol Tab 500 mg (41.3) | 6428200 | 14,29,860/- | |
| ६ | Syrup Furazolidone 25 mg/5 ml 60 ml Bottle (121.2) | 264395 | 18,86,953/- | |
| ७ | Sodium Hypochlorite Solution 200 ml (428.1) | 366027 | 32,38,395/- | |
| ८ | Ciprofloxacin tab 500 mg [69.2] | 3429300 | 9,60,000/- | 22100629 |
| ९ | Cefotoxime Inj 1 gm Vial [62.3] | 31275 | 35,998/- | 22100208 |
| १० | Secinidiazole Tab 1 mg [93.1] | 60000 | 19,996/- | 22100101 |

<u>अटी:-</u>

१) सदरहू औषधांची आवश्यकता/मागणी याची शहानिशा/खातरजमा करण्यात यावी.

२) सदर बाबींचे विनिर्देश गरजेनुसार व अद्ययावत असल्याची खातरजमा करण्यात यावी. खरेदी करावयाच्या बाबींचे तांत्रिक विनिर्देश (Technical specification) संबंधित तज्ञांनी (तांत्रिक समिती/अधिकारी यांनी) मान्य केलेल्या विनिर्देशानूसार असावेत. तसेच सदर तांत्रिक विनिर्देश (Technical specification) हे कोणत्याही विशिष्ट कंपनीला फायदा होईल अशा रितीने तयार केलेले नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच या बाबींची खरेदी करण्यात यावी.

३) शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, क्रमांक भांखस २०१४/प्र.क्र.८२/भाग-III /उद्योग-४, दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारीत नियमपुस्तिका यामधील तरतुदीनुसार विहित खरेदी प्रक्रिया राबविण्यात यावी.

४) प्रशासकीय मान्यता देताना प्रस्तावित खरेदीचे दर हे अंदाजित आहेत. त्यामुळे खरेदी प्रक्रियेअंती निश्चित करण्यात आलेला दर हा बाजार भावापेक्षा कमी असल्याबाबत आणि संबंधित पुरवठादाराने या बाबीचा इतर ठिकाणी ज्या दराने पुरवठा केला आहे, त्या दरापेक्षा जास्त नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी.

५) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींची पुरवठापूर्व/ पुरवठानंतर नमुना तपासणी (Pre/Post dispatch random sample inspection) करुन उचित व योग्य विनिर्देश असलेल्या वस्तुंचीच खरेदी करण्यात येईल, याची खात्री करण्यात यावी.

६) सदरहू खरेदीसाठी होणारा खर्च खालील लेखाशिर्षाअंतर्गत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा:-

अ) "२२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य- राज्य योजनांतर्गत योजना- (०१) (४५) साथरोग नियंत्रण कार्यक्रम- २१, पुरवठा व सामग्री **( २२१० ४२८६)**".

आ) "२२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य- (०१) (०६) पटकी नियंत्रण कार्यक्रम (राज्य क्षेत्र)- २१, पुरवठा व सामग्री **( २२१० ०६२९)"**

इ) "२२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य- (०४) (०३) गुप्त रोग चिकित्सालय - २१, पुरवठा व सामग्री ( **२२१० ०२०८)".**

ई) "२२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य- (०१) आरोग्य सेवा संचालनालय, (०१) (०२) जिल्हा वैद्यकीय अधिकारी - २१, पुरवठा व सामग्री **(२२१० ०१०१)**".

७) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींचा पुरवठा झाल्यानंतर सदर बाबी विनावापर पडून राहणार नाहीत व त्यांचा विहीत मुदतीत वापर होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

८) सदर खरेदीची द्विरुक्ती (Duplication) होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

९) संपुर्ण खरेदी प्रक्रिया राबविताना केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे (CVC Guidelines) तंतोतंत पालन करण्यात यावे.

१०) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,भाग-२, दि.१७.०४.१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-दोन मधील अ.क्र.४, नियम क्रमांक ७ समोरील स्तंभ क्रमांक ६ येथील अटींची पुर्तता करण्यात यावी.

११) निविदा प्रक्रिया पुर्ण झाल्यांनतर खरेदी समितीच्या मान्यतेनंतरच पुरवठा आदेश निर्गमित करण्यात यावेत.

१२) दिनांक २६.०७.२०१७ च्या शासन निर्णयातील तरतुदीनूसार कार्यवाही करण्यात यावी.

**उपरोक्त अनुक्रमांक १ ते १२ येथे नमूद अटींची पुर्तता करण्याची संपुर्ण जबाबदारी संबंधीत कार्यक्रम प्रमुख यांची तसेच आरोग्य सेवा संचालनालयाची राहील तसेच आवश्यकतेपेक्षा जास्त खरेदी झाल्यास व विनावापर पडून राहिल्यास, मागणी नोंदविणारे संबंधित अधिकारी जबाबदार असतील.**

२. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,भाग-२, दिनांक १७.०४.२०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग दोन मधील अ.क्र.४, नियम क्र. ७ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानूसार सदरहू प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३११११०४७००५५१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Jamsher Samsher Tadavi

Digitally signed by Jamsher Samsher Tadavi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cc70f5be589b29aaa447f5cdd15c9826781de5daa02a4ecf339fb1d0559ab9d6, serialNumber=a92e218ede7b7c9acaa3bea18f6d46feab420783e12f260504f402b54de8c476, cn=Jamsher Samsher Tadavi
Date: 2019.03.11 11:16:14 +05'30'

**( ज.स.तडवी)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१) आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
२) संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
३) सहसंचालक, आरोग्य सेवा (खरेदी कक्ष), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
४) सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन) , आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
५) सहसंचालक, आरोग्य सेवा ( हिवताप, हत्तीरोग व जलजन्य रोग), पुणे
६) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखापरिक्षा/लेखा अनुज्ञेयता), मुंबई.
७) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखापरिक्षा/लेखा अनुज्ञेयता), नागपूर.
८) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
९) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
१०) अधिक्षक, प्रादेशिक मनोरुग्णालय, ठाणे /रत्नागिरी/पुणे/नागपूर
११) निवडनस्ती (आरोग्य-८)